दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/०३४/२०१७-१८
दि.१७/०३/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.कृष्णा सी. गुप्ता, ................अपिलार्थी
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
सहा.आयुक्त (सा.प्र.)

## -: विवेचन :-

श्री.कृष्णा सी. गुप्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांचेकडे दि.०६/१२/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

a) Kindly provide me the number of RTI applications filed in your office by public representatives- MLA, MP, and Corporators.
b) Give me the copies of RTI applications filed by them (MLA, MP and Corporators)
c) Give me the copy of Inward register of the above mentioned applications received by your office.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.१७/०२/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१७/०३/२०१८ रोजी दुपारी १२.३५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.सा.प्र./२३७/२०१८ दि.२८/०२/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.०६/१२/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला अद्यापपर्यंत माहिती दिलेली नसुन याबाबत संबंधितास नोटिस देण्यात यावी.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा सहा.आयुक्त (सा.प्र.) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. माझी जनमाहिती अधिकारी म्हणून दि.२१/०२/२०१८ रोजी नेमणूक झालेली आहे. तसेच अभिलेखात उपलब्ध असलेली अपिलार्थी अर्जदारास ७ दिवसांत उपलब्ध करुन देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: <u>निर्णय</u> :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा विभागप्रमुख (सा.प्र.) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत विनाशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच सहा.जनमाहिती अधिकारी तथा लिपिक यांनी माहिती तयार करण्यास विलंब केला असल्याकारणाने संबंधितास ७ दिवसांत नोटीस बजावण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.कृष्णा सी. गुप्ता,
एस-१०६/सी, पाटाडिया कॉम्प्लेक्स,
उत्तन रोड, भाईंदर (प.) ४०११०१.

२) जन माहिती अधिकारी तथा
विभागप्रमुख (सा.प्र.)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (सा.प्र.) यांचे कार्यालय.